# सेवक वार्ता

मे - २०२६

वर्ष - ७ अंक - ७

सेवानिवृत्त वनकर्मचारी संघ, महाराष्ट्र परिवाराचे विविध उपक्रम, विचारमंथन, घडामोडी, साहित्य याचे संवाद पत्र


## "माझे मत"

### हरीत महाराष्ट्र आयोगांतर्गत ३०० कोटी वृक्षारोपन मोहीम कशी यशस्वी करता येईल?

### How to make the 300 crore tree plantation campaign successful under Green Maharashtra Commission.

**अंमलबजावणी व्यवस्थेनुसार ही योजना सफल होण्यासाठी त्यात आमूलाग्र बदल करावे लागतील.**


वि.त्र्यं.पत्की.

से.नि. वन संरक्षक


हरित महाराष्ट्र आयोगाने २०२६ पासून वीस वर्षात ३०० कोटी वृक्ष लागवड व जोपासनेचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. म्हणजे दरवर्षी १.५ कोटी वृक्ष लागवड करावी लागेल. एका हेक्टर क्षेत्रावर सरासरी ५०० रोपे लागवड केली,तरी,दरवर्षी लागवडीसाठी सुमारे (१५००००००÷५००=३०,००० हे.) ३०,००० हेक्टर क्षेत्र लागेल. वीस वर्षात ही संख्या (३०,०००×२०=६०००००) ६ लाख हेक्टर होईल. हे वनीकरण ग्रामीण भागात वन क्षेत्राचे बाहेर, तर शहरी भागात वन क्षेत्रावर करण्याचा मानस आहे. येवढे प्रचंड क्षेत्र ग्रामीण विभागात उपलब्ध होण्याची शक्यता दुरापास्त आहे. वनीकरणाचे काम व जोपासना प्रामुख्याने JFMCs & FFOs मार्फत करण्याचा मानस आहे. महाराष्ट्रात सुमारे १५,००० JFMCs नोंदणीकृत असून, त्यांचे कार्यक्षेत्र वन जमीनीवर आहे.या समित्या त्यांचे कार्यक्षेत्राबाहेर काम करण्यास इच्छुक व सक्षम कशा होतील याचा विचार करावा लागेल.

पाचव्या वर्षी अखेरीस जीवंत रोपांची टक्केवारी ६०% असणे गरजेचे आहे. तेवढी टक्केवारी नसल्यास,काय व कुणी कृती करावी याबाबत शासन निर्णय मूक आहे. तृतीय पक्ष मूल्यांकन प्रत्येक वर्षी केल्यास खर्चावर व कामांचे प्रतवारीवर नियंत्रण ठेवता येईल. वन विभागास अंमलबजावणीसाठी दूर ठेवण्याचा हेतू पण स्पष्ट होत नाही. हरित आयोगाचे अध्यक्ष वन अधिकारी न ठेवता इतरांस हे पद भूषविण्यास सक्षम कशाचे आधारे ठरविले हे पण स्पष्ट होत नाही. सगळे गौडबंगाल वाटते आणि सध्याच्या शर्ती आणि अंमलबजावणी व्यवस्थेनुसार ही योजना सफल होण्याची शक्यता नाही. त्यात आमूलाग्र बदल करावे लागतील.

---

**मोहीम यशस्वी करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांचे समन्वयातून करणे आवश्यक.**


मनोहर.ए. सैदाणे.

से.नि. विभागीय वन अधिकारी


वृक्षारोपण मोहीम यशस्वी करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांचे समन्वयातून करणे आवश्यक आहे.

1. आर्मीकडील क्षेत्रे, जेल परिसरात, शासकीय कार्यालयात, निवासस्थानाचे परिसरात, खाजगी कंपनी व आय.टी परिसर, प्राथमिक व माध्यमिक विद्यालये, कनिष्ठ व जेष्ठ महाविद्यालये, विद्यापीठे, तीर्थक्षेत्रे, दवाखाने, महसूल कार्यालये, कृषी कार्यालये, कृषीबाजार समिती कार्यालये, एमआयडीसी परिसर, पोलीस कार्यालये, आर.टी.ओ. कार्यालये व पेट्रोलपंप, ढाबा , ग्रामपंचायत, आठवडी बाजार, जिल्हा परिषद वपंचायत समिती कार्यालये व इतर संस्थेत (केंद्र शासनाची कार्यालयेसह) रोपे लागवडी कुंपणात / ट्री गार्ड मध्येच लावण्याबाबत बंधन घालणे आवश्यक.
2. कॅनाल साइड, राष्ट्रीय महामार्ग व इतर रोडसाइड रेल्वेसाइड, मोठे, मध्यम, लघू धरणाचे बुडीत क्षेत्रा बाहेरील क्षेत्रावर, शेत तळे इ. जवळील रोपवाटिकेतून लागवडीचे रोपे देवून, कुंपणात लागवडीसाठी कार्यक्रम घेणे.
3. विद्यार्थ्यांकडून घरी/ परीसरात रोपे लावल्यावर जिवंत रोपावर अतिरिक्त (ग्रेस) मार्क देणे.
4. दर रविवारी शहरात सामाजिक वनि. खात्यातर्फे कमी भावात नविन बांधलेले प्लाट एरीयातील घरोघरी विवीध रोपे व सागाच्या जडया विक्री करणे आवश्यक आहे. या प्रकारचा उपक्रम आम्ही, श्री अनिल मोहन, सह संचालक सा. व. साहेब यांचे मार्गदर्शनात (तत्कालीन) अकोला वृत्तात राबविण्यात आला आहे. चांगला प्रतिसाद होता.
5. पावसाळ्याचे सुरवातीलाच ट्रॅक्टरने बाजारात साग जडया विक्री करणे आवश्यक आहे. वर्धा जिल्ह्यात शेताच्या बांधावर, खूप शेतकऱ्यांकडून साग जडयाची लागवड झाली असून काही शेतकरी वर्ग त्या उगवलेल्या साग वृक्षामुळे हजारोपती झाला आहे.
6. वरील कार्यक्रमात स्वयंसेवी संस्थां, एन.सी.सी. एन. एस. एस., होम गार्ड, स्काउट , पर्यावरणीय संस्थांचे सहभागातून व श्रमदानातून घेणेस हरकत नसावी. शहरी वृक्ष लागवड, ट्री गार्ड मध्येच, मोठया सावलीसाठी अत्यंत आवश्यक आहे.

*************

**"माझे मत" सदराचे जून अंकासाठी विषय**

***महाराष्ट्रातला मानव-वन्यप्राणी संघर्ष कसा संपवता येईल***

## पुत्र व्हावा ऐसा गुंडा,

# वनपाल पुत्राची अलौकिक कामगिरी

धुळे – सामाजिक वनीकरणविभागातील शिरपूर स्थित वनपाल श्री. डी बी पाटील, यांचा मुलगा विवेक माळी यांचे क्रिकेट स्पर्धासाठी झालेल्या लिलावात २२ लाख रुपये किंमत देऊन एका टीमने घेतले.

डी बी पाटील दादा यांचा संपूर्ण परिवाराचे अभिनंदन . विवेक माळी उत्कृष्ट क्रिकेट खेळाडू तर आहेच, पण हा मुलगा पुण्याला टीसीएस कंपनी मध्ये संगणक इंजिनिअर आहे.

विवेक दिलीप माळी याच्या खेळाचे छंदामुळें धुळे जिल्ह्याचे आणि डी बी पाटील वनपाल आणि परिवाराचे सुध्दा नाव रोशन केले.

श्री. व्ही. टी. पत्की यांनी विवेक माळी व त्यांच्या आई-वडिलांचे विशेष अभिनंदन करतांना म्हटले की, क्रिडा, शिक्षण क्षेत्रात नैपुण्य मिळविण्यास कठोर प्रयत्न व सातत्य आवश्यक असते. क्रिकेट खेळ श्रीमंतांचा म्हणून ओळखला जातो, त्यात वनपालांच्या मुलाने नैपुण्य मिळविणे अभिमानास्पद आहे.

# वन सान्निध्याची साठी

विठ्ठल त्र्यंबक पत्की

### सहायक वनसंरक्षक पदाकरीता प्रयत्न

मी परीक्षेला बसण्यासाठी फॉर्म भरला. गणित, जनरल नॉलेज, कृषीशात्र व वनस्पतीशास्त्र हे चार विषय निवडले. आता कंबर कसून तयारी करणे आवश्यक होते. पुण्याला आपटे रस्त्यावर श्री. बापट हे सेवानिवृत्त फौजी अधिकारी गणित व जनरल नॉलेजचे क्लासेस घेतात असे ऐकले होते. सरळ त्यांना जाऊन भेटलो आणि शिकवणीची विनंती केली. शिकवणीला कधी येशील अशी विचारणा त्यांनी मला केली. रात्रो ८.३० ते १०.३० वेळ सोईची आहे का अशी विचारणा मी त्यांना केली. हीच वेळ का? असा प्रश्न त्यांनी केला. "सर, मी कर्जतला कृषी विभागात कार्यरत असून, माझी तेथील कामाची वेळ सकाळी ८.०० ते दुपारी ५.०० असते. मी रोज डेक्कन क्वीन एक्स्प्रेसन रात्रा पुण्यास येऊन क्लासला वेळेवर येऊ शकतो. आणि सकाळी ६.१० चे सिंहगड एक्सप्रेसने निघून सकाळी ८.०० वा. कर्जतला पोहचू शकतो. माझा पक्का निर्धार पाहून बापट साहेबांनी होकार दिला. तुमची फी किती असे विचारल्यावर त्यांनी हसून उत्तर दिले, "आधी पास तर हो, फीचे नंतर बघू". तत्ववादी साहेबांनी सुध्दा वेळेचे बंधन शिथील केले. एक महिन्याचे कठोर परिश्रम पार पाडून मी लेखी परिक्षेचा अडसर दूर केला. बापट साहेबांना भेटून त्यांना पेढ्याचा पुडा देऊन आशिर्वाद घेतले व रु. शंभर त्यांना देव केले त्यांनी फक्त रु.२१/- स्वीकारून बाकीची रक्कम परत केली व शुभेच्छा दिल्या. आता मौखिक परीक्षा पार पाडणे आवश्यक होते.

### सौ. लीलाताई खोत यांची अनमोल मदत-

आपले श्री. विष्णु वामन खोत, से. नि. संचालक, सा. व. यांच्या लीलाताई पत्नी होत्या. त्यांचे माहेरचे आडनाव देशपांडे होते. लीलाताई यांचे वडिल पुण्याच्या COEP मध्ये प्रोफेसर होते. लीलाताई माझे चुलत बंधुंना (उध्दव) भाऊ मानत होत्या व मायेने त्यांना उध्दव नावाने हाक देत असत. मी लोकसेवा आयोगाची लेखी परीक्षा उत्तीर्ण केल्याची वार्ता लीलाताईंना समजल्यावर, त्याना विचार व्यक्त केले "उध्दव, तू काळजी करु नकोस. मी खोत साहेबांना सांगते, त्यांचे आणि बूट साहेबांचे संबंध खूप चांगले आहेत. तुझे काम फत्ते झाले म्हणून समज. "मला मात्र या चर्चेचा सुगावा दोघांनीही लागू दिला नाही.

### श्री. मरबल्ली साहेबांची आपुलकी -

मरबल्ली साहेब पण उध्दव यांचे कडून कपडे शिवून घ्यायचे. त्यांनी सुध्दा बूट साहेबांकडे शब्द टाकण्याचे आश्वासन दिले. ते दुसरे सामाजिक वनीकरण संचालक होते. माझी मुलाखत उत्तम झाली व अंतिम निवड पण आनंद झाला.

### सुरक्षा बंधपत्रचा अडसर -

रू. १२,०००/- किंमतीची दोन बंध पत्रके सादर करणे आवश्यक होते. इथे मात्र आमचा कस लागला. बहुतेक ठिकाणी नकार मिळाला. लीलाताईंच्या मध्यस्थीने एक बंधपत्र त्यांचे वडिल प्रो. देशपांडे यांनी दिले. पण दुसऱ्याचे काय? बंधपत्र देण्याची मुदत संपण्यास दोन दिवसांचा कालावधी असतांना, एक देवदूत शेतकरी मदतीस धावून आला. हडपसरचा हा शेतकरी बंधू माझे बंधूंना काळजीत पाहून विचारु लागला की मी काय मदत करु ? रू.१२,०००/- चा सुरक्षा बंधपत्र देऊ शकाल काय असे विचारले असता, त्याने पटकन होकार दिला व काम पूर्ण करुन दिले. त्या देवदुताचे नाव मला आठवत नाही याची खंत आहे. पण त्यांचे उपकार मी कधीच विसरु शकत नाहा.

### माझे कुटुंब -

मला तीन पुत्र असून, मोठा पुत्र पराग १९९९ पासून अमेरिकेत स्थायीक आहे. कनिष्ठ पुत्र परशुराम २००४ पासून अमेरिकेत स्थायीक आहे. मधला पुत्र प्राजक्त पुण्यात असून त्याची स्वतःची संगणक प्रशिक्षण संस्था आहे, तिचे नाव " Envision Computer Training Institute आहे. ही संगणक प्रशिक्षण संस्था निर्माण करून तिचे बळकटीकरण करण्यासाठी त्याची पत्नी सौ. प्रीति (सपना) हिचा मोठा वाटा होता. दुर्दैवाने कर्करोगाने तिला तरुण वयात ग्रासले होते. या रोगाशी टक्कर देताना तिने शिक्षकाचे कार्य अखेर पर्यंत निभावले होते. अंथरुणावर असून सुद्धा ती विद्यार्थ्यांना अंथरुणाचे सभोवती बसवून शिकवीत असे. अखेरीस दि. ४-१०-२०१८ रोजी तिचे दुःखद निधन झाले. तिचे कार्य, हसरा चेहेरा आणि शिकविण्याची आवड सदैव माझे स्मृतीत राहील. तिला एक मुलगी असून तिचे नाव श्रावणी आहे. श्रावणी आता प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदवीचे प्रशिक्षण घेत आहे.

### इंडियन फॉरेस्ट कॉलेजातील प्रशिक्षण (२)

### लोकसेवा आयोगा मार्फत निवड

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने १९६५ साली सहाय्यक वनसंरक्षक य वर्ग-२ च्या पदासाठी व वानिकी प्रशिक्षणासाठी पुढील व्यक्तींची निवड केल होती.

१. श्री.ए.आर.बापट  २.श्री.एस.डी. दक्षिणदास

३.श्री.व्ही.टी.पत्की ४.श्री. के.व्ही. किसवे
५. श्री.व्ही.आर.साने ६.श्री.व्ही.बी.परदेशी
७. श्री.एस.जी.जोशी ८. श्री.एम.व्ही.जोशी
९. श्री.एम.के. पातुरकर १०. श्री के.ए. शेख
११.श्री.जी.एम.महाला १२.श्री.जी.एस.कंण्डे
१३.श्री. कोप्पीकर १४. श्री. भालेराव
१५. श्री. दवे

या पैकी श्री भालेराव व श्री दवे हे शारीरीक पात्रता नापास झाल्याने त्यांना डेहराडून येथून परत पाठविण्यात आले. श्री. कोप्पीकर प्रशिक्षणास डेहराडूनला आलेच नाहीत. प्रशिक्षण कालावधी ०१-०४-१९६५ ते ३१-०३-पुण्याहून १९६७ होता. निवड झालेले बापट, साने, शेख, महाला आणि मी यांनी एकत्र डेहराडूनला जाण्याचे ठरविले. दि.१ एप्रिल १९६५ रोजी मुंबई सेंट्रल येथून रात्रो निघणाऱ्या डेहराडून एक्स्प्रेसने आम्ही निघालो. दुसरे दिवशी सकाळी ट्रेन मध्यप्रदेशातील रतलामला आली. घरापासून दूर जात असल्याची संवेदना येत होती, पंडित जवाहरलाल नेहरुंचे आवडते हिल स्टेशन डेहराडून येथे दोन वर्षे वास्तव्य करण्याचे कुतहूल सुखकारक वाटत होते. ट्रेन आता राजस्थानच्या अरावली पर्वतातून नागमोडीची वळणे घेत पळत होती. अख्खा पर्वतमय प्रदेश पळसाच्या भगव्या फुलांनी बहरला होता. विलोभनीय दृष्य होते.

अंगात महाराणा प्रताप संचारून आला होता, वीरश्री नसातून वाहू लागली होती. एवढ्यात बापटांच्या अंगातील कवी जागृत झाला "झुकू झुकू आगीन गाडी, पळते पळसाच्या रानात, मला आठवला महाराणांचा प्रताप. मी पण दाखविणार माझे शौर्य, फुलविणार वनश्रीचा हिरवा चुडा, जय-जय शिवराया".

हळू-हळू आम्ही कोरस धरला बापटांचा. आता ट्रेनमधील इतर प्रवासी आमचेकडे आश्चर्य व आदराने पाहू लागले होते व चौकस बुध्दीने कुठे, कशाला जाणार याची विचारपूस करू लागले. आमचे अंगावर मूठभर मांस चढल्याची भावना संचारली. कोटा, सवाई माधोपूर, मथुरा, आग्रा, करून दिल्ली येथे दुसरे दिवशी रात्री पोहचलो होतो. त्यावेळी दिल्ली ते डेहराडून कुठ, कशाला जाणार याचा विचारपूस करू लागल. आमच अगावर मूठभर मांस चढल्याची भावना संचारली. कोटा, सवाई माधोपूर, मथुरा, आग्रा, करून दिल्ली येथे दुसरे दिवशी रात्री पोहचलो होतो. त्यावेळी दिल्ली ते डेहराडून ट्रेनने सुमारे १२ तास लागायचे. दिल्ली ते डेहराडून प्रवास शिवालीक पर्वतमय रांगातून होता. साल, ऐन, हिरडा, बेहडा, धावडा, तेंदू या झाडांची तोंड ओळख बापट आम्हाला करुन देत होते. बापट वनस्पती शास्त्र विषयात एम. एस. सी. करित होते व पुण्याच्या गरवारे महाविद्यालयात **Botany Demonstrator** पदांवर कार्यरत होते. सहारनपूर, मीरत, हरिद्वार, ऋषिकेश, फोंदावाला, डोईवाला मार्गे डेहराडूनकडे कूच करित होतो. डोईवाला येथे प्रथमच मातीच्या भांड्यातून (कुल्लड) गरम-गरम चहाचा आस्वाद घेतला. गंगेच्या किनारची माती अद्भुत वाटली. मसूरीचे बर्फाच्छादीत डोंगर पाहून खूष झालो. डेहराडून आले. सायंकाळ झाली होती म्हणून रात्री हॉटेल मध्ये मुक्काम करुन दुसरे दिवशी सकाळी एफ. आर. आय. मध्ये जाण्याचे ठरले. सायंकाळी पलटण बाजारातून फेरफटका मारून सुकामेव्याची रेलचेल बघीतली. रात्री पंजाबी चाटवाले सुग्रास भोजन केले. सकाळी एफ. आर. आय मधील जुन्या होस्टेल मध्ये पोहचलो. नोंदणी केल्यावर रुमचे वाटप केले गेले. मला रुम पार्टनर श्री. उपेंद्र प्रसाद, बिहार मिळाले. डी-१४ रुम आम्हाला मिळाली. मी, माझे सामान घेऊन रुम वर गेलो. श्री उपेंद्र प्रसाद यांनी माझे स्वागत करून सामान लावण्यास मदत केली. श्री. प्रसाद यांनी सरळसेवा भरती वनक्षेत्रपाल पदाचे दोन वर्षे कालावधीचे प्रशिक्षण पूर्ण केले होते. त्यांचे ज्ञान व अनुभव यांचा मला खूप लाभ झाला.

आमचे घरकुलात (हाऊस) ६ जण होते.
१. श्री. उपेंद्र प्रसाद-बिहार
२. मी-महाराष्ट्र
३. श्री. जगन मोहन राव-आंध्रप्रदेश
४. श्री. देवीदयाळ चतुर्वेदी-उत्तर प्रदेश
५. श्री. बनारसीदास-हरयाणा
- मध्यप्रदेश

यापैकी श्री. चतुर्वेदी व श्री. चौहान यांचे निधन झाले आहे.

**अलींचा प्रवेश-**

श्री. अली सर्व प्रशिक्षणार्थींना शारीरीक शिक्षण, ळ, उबदार कपडे, खरेदी करिता लागणारे सामान उधारीवर पुरवीत असत. ते फक्त रोल नंबर विचारीत आणि तुम्हाला लागणारे सर्व सामान रूमवर आणून देत. प्रशिक्षणार्थींनी आपले सोयीने खरेदी रक्कम अदा करावी ही त्यांची इच्छा होती. सेवाव्रत म्हणून त्यांनी हा धंदा स्विकारला होता.२००० साली तीन आठवड्याचे उजळणी प्रशिक्षणासाठी मी डेहराडूनला आलो होतो, त्यावेळी श्री. अली रुम वर आले आणि विचारले, साहाब पह पाना क्या ? " मी त्यांना उत्तर दिले," अलीजी मैं आपको कैसे भूल सकता हूं ?" कोणत्याही प्रशिक्षणार्थिने श्री. अली यांची एक दमडी सुध्दा डूबवली नाही. आपसी विश्वास व सेवा हा त्यांच्या यशाचा मंत्र होता. या अलींनी मला कुठले सामान खरेदी करावे याचा योग्य सल्ला देऊन, ते सामान आणून दिले.

**कोहली टेलर -**

सर्व प्रशिक्षणार्थिचे ड्रेस शिऊन देण्याचे काम श्री. कोहली टेलर करिता असतं. **Perfect Fitting Dress** तयार करण्याचा त्यांचा हातकंठा होता. त्यांची उंची जेमतेम पाच फूट होती, म्हणून ते काही वेळा स्टूल वर उभे राहुन मापे घेत होते. ईश्वरांने त्यांना अद्भुत शिवणकला दिली होती.

**सायकल पुरवठा-**

प्रत्येक प्रशिक्षणार्थिकडे सायकल असणे गरजेचे व बंधनकारक होते. सायकलची किंमत त्यावेळेस रु. १२०/- ते १५०/- दरम्यान असायची. एक सरदारजी सायकली पुरविण्याचे काम करायचे. उधारी व रोल नंबरवर स्टर्डी सायकली होत्या. तक्रारीला जागा नाही.

**श्री. अरोरा, फोटोग्राफर-**

श्री. अरोराजी हे उत्कृष्ट फोटोग्राफर होते. अल्पदरात फोटो काढून, डेव्हलप आणि प्रिंट काढून पुरविण्याचा त्यांचा छंद होता. ते, शैक्षणिक दौऱ्यावर पण येऊन फोटोग्राफी करिता असत. श्री. अरोरा/अली/कोहली ही त्रिमूर्ती होती.

सकाळी ६.०० वाजता, सर्व प्रशिक्षणार्थी सायकल वरून मैदानावर हजर होत असत. पांढरी अर्धी चड्डी, पांढरा

बिन बाहीचा बनियान, पांढरे मोजे व पांढरे शूज घालून सगळे आले होते. परत जातांनां पुलओव्हर परिधान करावयाचा असल्याने, तो नेणे बंधनकारक होते. बरोबर ६.०० वा. श्री. ओ. ई. पीटर्स सर मैदानात आले. त्यांनी आम्हाला तीनच्या फाईल मध्ये उभे करुन, पळण्यासाठी सज्ज केले. तत्पूर्वी त्यांनी प्रत्येक जण दाढी करुन आला आहे किंवा नाही याची खात्री केली (अपवाद सरदारजी यांचा), पीटर्स सरांचे वय श्री पीटर्स सर त्यावेळी (१९६५) सुमारे ५०-५१ असावे. ते सुध्दा आमच्यासारख्या पेहराव करून आले होते. काही संज्ञांची माहिती देऊन व त्याचा सराव करुन, त्यांनी आम्हाला हळू-हळू पळण्याचा आदेश दिला. नंतर वेग वाढवून, हात वर करुन, कमरेवर ठेऊन सुमारे अर्धा तास पळवून घाम काढला. परत फाईल मध्ये उभे करुन उभ्याने कसरत करून घेतली आणि ४५ मिनीट्रांनी मुक्त केले. जातांना पुलओव्हर प्रत्येकाचे अंगावर आहे की नाही याची तपासणी ते करित होते. शेवटी, त्यांनी उपदेश केला की **"Boys, you will forget all forestry knowledge but my PT will keep you fit and healthy throughout life. If, I deduct your conduct marks, none will come to your rescue, because your President, DFE, Dean and all Instructors were my trainees. "**पीटर्स सरांचे मोठे डोळे, बोलका चेहरा, कडक शिस्त पाहून, भीतीयुक्त आदर वाटायचा. त्यांनी आमचे शरीरघडविले, म्हणून आज वयाच्या ८२ व्या वर्षी मी या पुस्तकाचे लिखाण करण्यास सज्ज आहे. पीटर्स सरांनी एकाचेही शिस्तीचे गुण कापले नाहीत, हे त्यांचे सौजन्याची प्रचिती देते.

पहिला ब्रेकफास्ट -

पी.टी.हून परत आल्यानंतर, गरम पाण्याने आंघोळ केली. कडकडून भूक लागली होती. आम्ही कुठल्या मेसमध्ये आहार घ्यायचा हे अजून ठरले नव्हते. जुन्या होस्टेल समोर एक मेस, तर नवीन होस्टेलमध्ये एक मेस होती. रूमच्या बाहेर येऊन सायकलवर टांग मारुन बाहेर जातांना श्री. परदेशी भेटले. त्यांनी मला विचारले कुठे चालला? चल आपण जुन्या मेस मध्ये जावू या.

मेस एटिकेटचे शिक्षण (शिव्या) झेलत, वजनदार, सकस ब्रेकफास्ट ग्रहण केला. पोट भरले कां? असा प्रश्न परदेशी यांनी मला केला? व सायकलवर टांग मारुन त्यांनी नवीन होस्टेलच्या मेसकडे ब्रेकफास्टचा दुसरा राऊंड घेण्यासाठी धाव घेतली. जातांनां मला विचारले, येतोस कां?

श्री.टी.एन.श्रीवास्तव -

हे FRI & Colleges चे अध्यक्ष होते. सुमारे सहा फूट दोन इंच उंच, आकर्षक व्यक्तीमत्वाची असामी होती. शांत प्रवृत्तीचे, उत्तरप्रदेश केडरचे वन अधिकारी होते. दि.२६ मे, १९६६ रोजी, त्यांनी" **Abridged Glossary of Technical Terms**" ही पुस्तिका तयार करून प्रकाशित केली. १६८ पृष्ठांची ही अनमोल पुस्तिका, मूल्य रु.१-२५ फक्त, अजूनही माझेकडे असून, ती मला वानिकीची पोथी वाटते.

श्री.आर.सी. कौशिक-

जुन्या पंजाब व आत्ता हिमाचल प्रदेशातील हे वन अधिकारी, डायरेक्टर ऑफ फॉरेस्ट एज्युकेशन होते. मजबूत उंच बांधा, करडी नजर, डरकाळी फोडणारा आवाज असे त्यांचे व्यक्तीमत्व होते. प्रशिक्षणार्थीच नाही तर प्रशिक्षण देणारे निदेशक पण त्यांना टरकून असत.लेक्चर सुरू असतांनाच ते हळूच मागच्या दरवाजाने प्रवेश करुन विद्यार्थी व शिक्षक यांची निगराणी करित असत.त्यांना "ढाण्या वाघ " म्हणून मी घाबरत व पूजत असे.

श्री.एच.सी.डे-

डे साहेब IFC चे डीन होते. उत्तरप्रदेश राज्यातील वनसंरक्षक दर्जाचे ते अधिकारी होते. चिरुट व पाईपने स्मोकिंग करुणेचा छंद/व्यसन त्यांना होते. अतिशय शांत, सौजन्यशील व्यक्तीमत्व त्यांचे होते. ते आम्हाला फॉरेस्ट मॅनेजमेंट व वींग प्लान विषय शिकवीत होते.

श्री. भरतासिंह -

राजस्थान केडरचे हे साहेब सॉईल कंझर्व्हेशन हा नवीन पण आवश्यक विषय अत्यंत तळमळीने शिकवित असतं. सौम्य स्वभावाचे परंतु अफाट क्षेत्रीय ज्ञान व अनुभव असलेले वन अधिकारी होते.

श्री.के. के. माथूर -

हे पण राजस्थान केडरचे वन अधिकारी आम्हाला **"Silviculture of Trees"** हा विषय रंगवून व झाड प्रत्यक्ष मनासमोर ऊभे करून शिकवीत असत. अंदमान-निकोबार, अरुणाचल प्रदेश या भागातील वनसंपदा शिकवितांना ते समरस होत होते.

सरदार सोहनसिंग -

हे सरदारजी सर आम्हाला वनस्पतीशास्त्र विषय शिकविते काश्मिर राज्याचे ते वन अधिकारी होते. फ्लोरा न वापरता वनस्पती ओळखण्यात (फील्ड बॉटनी) ते वाकबगार होते. FRI मधील वनस्पतींची ओळख त्यांनी आम्हास करून दिली. अत्यंत साधी राहणी व उच्च विचारसरणीचा अवलंब ते करित.

श्री.एम.एन. वैष्णव -

हे सर आम्हाला वनसंवर्धन शास्त्र हा विषय शिकवायचे. मूळचे मुंबई राज्यातून निवड झालेले परंतु १९६० नंतर गुजराथ राज्यात गेले होते. त्यांची वन विभागात पहिली पदस्थापना सहाय्यक वनसंरक्षक, महाड (जिल्हा रायगड) येथे होती. त्यामुळे, त्यांना मराठी भाषा चांगली येत होती. अजूनही ते माझ्याशी ई-मेल संपर्कात असतात. १९५०-५२ काळात ते IFC मध्ये प्रशिक्षणार्थी होते. सौम्य पण शिस्तशीर असूनही ते मनमिळावू वृत्तीचे आहेत. शारीरीक संपन्नता उत्तम आहे. गुजराथ राज्याचे प्रधान मुख्य वनसंरक्षक पदावरून ते निवृत्त झाले. आम्ही त्यांचे टोपण नाव "बापू" ठेवले होते.

श्री. एस. के. सुरी

हे पंजाबी वन अधिकारी मध्यप्रदेश संवर्गातील होते. शांत, मनमिळाऊ, अभ्यासू वृत्तीचे होते. वन सर्वेक्षण हा विषय त्यांनी आम्हाला प्रथम वर्षात, तर वन उमयोगी शास्त्र हा विषय दुसऱ्या वर्षात शिकविला.

श्री.एम.व्ही.आचार -

हे वन अधिकारी नसून, अभियांत्रिकी पदवीधर होते. कानडी भाषीक परंतु वन अभियांत्रिकी हा कठीण विषय ते अतिशय सोपा करून शिकवित असत. दोन्ही वर्ष त्यांनी हा विषय हाताळला.

श्री.व्ही.बी. सहारिया -

मध्यप्रदेश राज्याचे हे वन अधिकारी यांनी आम्हाला वन सांख्यिकी व वनमिती है विषय शिकविले. सोपा विषय कठीण करुन शिकविण्यात ते तरबेज होते. पहिल्या वर्षाचे स्नेहसंमेलनात त्यांना फिशपाँड मिळाला होता "एप्रिल फूल बनाया, -----ने मेंसुरेशन पढाया".

**श्री.पी.के.दवे -**

मध्यप्रदेश राज्याचे हे वन अधिकारी शिकविण्यात कच्चे होते पण मनाने सच्चे होते.

**श्री. ब्रह्मा सर -**

उत्तरप्रदेश राज्याचे हे वन अधिकारी काही काळ वनमिती शिकवीत होते. अतिशय माथेफिरु व रागीट स्वभावाचे होते. शिकविण्याची कला त्यांना अवगत नव्हती.

**श्री. टी.एन. महर्षी-**

मध्यप्रदेश राज्याचे ते वन अधिकारी होते. प्रामुख्याने ते आमचे बरोबर विविध दौऱ्यावर येत असत.

**श्री.एस.एस.पी.जाधव -**

हे शास्त्रज्ञ सॉईल सायन्स विषय मस्त शिकवित असत. भूगर्भशास्त्र, जल संधारणा यांचा परामर्ष पण ते घ्यायचे. किटकशास्त्र, बुरशी शास्त्र विषय शिकविण्यासाटी संचधत येत होते.

**डॉ. गिडीयन आणि डॉ. भट्टाचार्य –**

हे दोनीही डॉक्टर आम्हाला प्रथमोपचार विषय शिकवायचे. ते आमच्या आरोग्याची काळजी घेत होतेभारतातील

**वनसंपदेचा दौरा व अभ्यास -**

दोन वर्षे कालावधीच्या वानिकी प्रशिक्षण कालावधीत भारतातील विविध राज्यांतील वनक्षेत्रांना भेटी देवून त्यांचा अभ्यास करण्याची संधी मिळते.

**हिमाचल प्रदेश अभ्यास दौरा -**

१९६५ साली भारत व पाकिस्तान यांच्यात युध्द सुरु असल्याने, आमचा प्रथम दौरा उत्तरप्रदेशातील (आता उत्तराखंड) चकरौता येथे आयोजित न करता, हिमाचल प्रदेश राज्यात आयोजित केला होता. सगळ्यांचा मुक्काम सफेद रंगाच्या तंबुत होता. एका तंबुत दोन विद्यार्थी निवास करिता होते. खडराला गावी पहिला मुक्काम होता. नदीचे किनारी हे छोटे गाव होते. दररोज ताजी मासळी भोजनात असे. चारही बाजूने उंच हिमालयाचा परिसर आणि थंडगार शुध्द हवा व नीरव शांतता. येथे आम्ही चीर पाईन, कैल, देवदार, सिल्व्हरफर या सूचीपर्णी वृक्षांचा आणि ओक, बीच, अक्रोड, भोजपत्र, होडेडेंड्रोन या द्विधा वनस्पतींचे वनसंवर्धनशात्र शिकलो. चीर पाईन समुद्र सपाटीपासून ८०० ते १२०० मीटर उंचीवर, देवदार १२०० ते २००० मीटर उंचीवर, सिल्व्हरफर २८०० ते ३५०० मीटर उंचीवर, तर कैल २००० ते २८०० मीटर उंचीवर पसरलेले होते. थोडक्यात ८०० मीटर ते ३५०० मीटर उंचीपर्यंतची पायपीट करणे जरुरी होते. थंड हवेमुळे व तरुण वयामुळे थकवा येत नसे, पण पाय दुखत असत. तीन-चार दिवसांनी सवय व सराव झाला.

त्यावेळी कुपांची कामे मक्तेदार करित होते. त्यांची, आमची सरबराई करण्याची चुरस व चढाओढ असायची. दररोज नवीन मक्तेदार भोजन व्यवस्था करिता असे. शाकाहारी व मांसाहारी विविध चविष्ट पदार्थांची फीस्ट असे ग्राफोड़, बदाम, पिस्ते, काजू, मनुका यांची रेलचेल, आपल्या शगदाण्या सारखी असायची. स्वीट डिशेस पण नमुनेदार असायच्या.

मल्चिंग व ह्यूमस इथेच पाहिले आणि शिकलो. खडराला सोडतांना वाईट वाटले. खेचरांवर सामान लादून परत पायपीट सुरू. मनाली -मनाली हे हिमाचल प्रदेशातील सुंदर हिलस्टेशन आहे. चहुकडे देवदार वृक्ष व बर्फाच्छादित हिम शिखरे, विलोभनीय निसर्ग. येथे आम्ही रोहतांग पास पर्यंत गेलो होतो. आता तिथे अटल टनेल झाला आहे. ३० ते ४०मीटर उंचीची सिल्व्हरफर झाडे बघतांना, डोक्यावरील सोलर टोपी उलटी होत असे. अनेक हौशी पर्यटक येथे माउंटेनियरींगसाठी येतात.

**पंजाबचा मृदसंधारण दौरा -**

पंजाबमधील चंदीगड, होशीयारपूर, हरियाणातील कर्नाल येथील दौरा जमीनीची धूप व मृद्र संधारण यांचा अभ्यास करण्यासाठी फारच उपयुक्त होती.

चार आण्यात मोठा ग्लास भरुन लस्सी आणि त्याच किंमतीत तेवढेच गरम मसालेदार दूध विसरणे शक्य नाही. मक्याची रोटी व सरसुकी सब्जी, पचण्यास जड पण पौष्टीक व चवदार.

**रोड अलाईनमेंट एक्सरसाईज -**

डेहराडून ते मीरत रस्त्यावर, डेहराडून पासून १८ मैल अंतरावर मोहंड हे वनक्षेत्रपालांचे मुख्यालय असलेले गाव आहे. तिथे आम्ही रोड करिता दहा दिवस मुक्काम केला होता. त्यावेळी तिथे वनक्षेत्रपाल पदावर श्री बिस्त हे अधिकारी होते. उत्तर प्रदेश राज्याचे सध्याचे मुख्यमंत्री श्री. योगी आदित्यनाथ यांचे ते पितामह होते. अर्थात १९६५ साली श्री. योगी यांचा जन्म झाला नव्हता. मोहंड येथे वन विभागाचे मोठे विश्रामगृह आहे. आम्ही तिथे असताना तेथील वनसंरक्षक (Conservator) यांचा मुक्काम मोहंड येथे होता. त्यांचे बंदोबस्तासाठी एक पोलीस सबइन्स्पेक्टर व काही हवालदार तिथे कार्यरत होते. वनसंरक्षकाचे बंदोबस्तासाठी पोलीस अधिकारी तैनात असल्याचे, मी पाहिलेले, ते पहिलेच व कदाचित शेवटचे उदाहरण असावे.

**कार्यआयोजना एक्सरसाईज -**

१९६७ साली आम्हाला डेहराडून नजीकच्या कांसरो व फोंदावाला वृक्षांच्या वनात कार्य आयोजना एक्सरसाईज करण्यासाठी १५ दिवस ठेवले होते. येथे हत्तींची संख्या खूप जास्त होती, म्हणून सायंकाळी सात नंतर कंदील, विजेरी, बत्ती तंबूच्या बाहेर वापरण्यास मनाई होती. अभ्यास गुपचूप तंबूत राहून करायचा आणि हत्तीच्या निदर्शनास प्रकाश आणून द्यायचा नाही, ही सुरक्षा अंमलात आणणे बंधनकारक होते. श्री. डे साहेब (डीन) यांनी शेवटी दोन दिवस आमच्या प्रत्येकाची मुलाखत सुमारे ३० मिनीटे घेऊन कामांचे मूल्यांकन केले होते.

**बिहार राज्यातील सरांडा वन विभागातील अभ्यास**

पूर्वीचे बिहार व आता झारखंड राज्यातील सरांडा वन विभाग घनदाट साल वृक्ष संपदेसाठी प्रसिध्द आहे. इथे जंगली हत्तींची संख्या विपुल असून, त्यांचा मानवाशी संघर्ष सतत सुरू असतो.सर्वसाधारणतः वनांतून जाणाऱ्या रस्त्यांचे किनारी सफेद रंगाचे दगड लावलेले असतात, परंतु येथे मात्र काळ्या रंगाच दगड उभे केले होते; कारण हत्तींपासून संरक्षण. अवर्णनीय साल वृक्षांचे श्रीमंत जंगल होते.

**आलापल्ली वनविभागात दौरा -**

प्रत्येक तुकडीतील प्रशिक्षणार्थिंना मध्यप्रदेशातील बोरी वनातील सागाचे व्यवस्थापन आणि महाराष्ट्रातील आलापल्ली वन विभागातील सागाचे व्यवस्थापन यांचे अभ्यासासाठी या हरिद्वार व ऋषिकेश तीर्थक्षेत्रांचे दर्शन घ्यावेच लागे. आलापल्ली येथील साग डौलाने अयोध्येच्या श्रीराम मंदिराची शोभा वाढवित आहे. कै. श्री. आर. बी. मुजुमदार व श्री. मॅकडोनल्ड या वन अधिकाऱ्यांनी तयार केलेली आलापल्ली उप वन विभागाची कार्यआयोजना, आजही "वनगीता" म्हणून पूजीली जाते. त्यावेळी आलापल्ली रोपवाटिकेसमोर प्रशिक्षणार्थिंना राहण्यासाठी डॉरमेटरी होत्या. आता नाहीत. तामिळनाडूतील टॉपस्लीप व निलगिरी रोपवने, महाबल्लीपूरम येथील सुरुची रोपवने, केरळ राज्यातील सदाहरित उंच वने, निलांबूर येथील सागाची वने, रबर व वेलदोडे लागवड, पश्चिम घाटातील वनश्री व देवराई. अनेक वने फिरलो होल्र्यात व मनात साठविली आणि त्यांच्या आठवणींवर वानिकी पदविका प्राप्त केली.

३१-०३-१९६७ : दीक्षांत समारंभ -

दोन वर्ष कालावधीचे प्रशिक्षण संपवून, परीक्षा उत्तीर्ण करुन आज आमचा पदविका वाटपाचा दीक्षांत समारंभ होता. सगळेजण ड्रेसमधे सभागृहात आसनस्थ झालेले होते. क्रमांकानुसार नावे पुकारुन पदविका प्रमाणपत्रे दिली जात होती. महाराष्ट्राचे आम्ही १२ जण होतो, त्यात माझा अर्मिकमेकांची गळाभेट घेऊन आम्ही सुखानंदाने निरोप घेतला, एफ. आर. आय. आणि डेहराडूनचा. सोडतांना खूप वाईट वाटले, पण त्याला इलाज नव्हता.

(क्रमशः)

---

## स्फूट....

### "तुम्ही ते कमावले आहे."

भारतातील निवृत्त लोकांना त्यांनी आयुष्यभर साठवलेले पैसे खर्च करता का येत नाहीत?

रमेश, हे नाव काल्पनिक आहे; पण कदाचित तुमचे वडील, काका किंवा शेजारी असू शकतात.

हे भारतीय मध्यमवर्गीय स्वप्नाचे एक यशस्वी उदाहरण आहेत. ते टंचाईच्या भारतात वाढले - रेशन कार्ड, फोनसाठी वर्षानुवर्षे वाट पाहावी लागायची, आणि नोकरीची स्थिरता हीच सर्वात मोठी गोष्ट मानली जायची.

४० वर्षे त्यांनी PSU किंवा कॉर्पोरेट नोकरीत प्रामाणिकपणे काम केले. ऑटोचा खर्च वाचवण्यासाठी बसस्टॉपपर्यंत चालत जायचे. शर्ट फाटेपर्यंत वापरायचे. मुलांच्या IIT कोचिंगसाठी आणि भव्य लग्नासाठी त्यांनी सुट्ट्या त्यागल्या.

आज, ६८ व्या वर्षी, त्यांच्या नावावर चांगल्या भागात स्वतःचे घर आहे आणि ₹३ कोटींहून अधिकचा निवृत्ती निधी FD, PPF आणि म्युच्युअल फंडमध्ये आहे. ते खेळ जिंकले आहेत. ते आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र आहेत. पण काल रात्री, मे महिन्याच्या उष्णतेत ते घामाघूम होऊन उठले कारण त्यांनी एसी एक तास चालवल्यानंतर बंद केला होता. वीज वाया कशाला घालवायची? ते पुटपुटले.

हीच आधुनिक भारतीय निवृत्त व्यक्तीची शोकांतिका आहे. ते मालमत्तेत श्रीमंत आहेत, पैशात श्रीमंत आहेत, पण जीवनशैलीत गरीब आहेत.

यालाच आर्थिक मानसशास्त्रात "Switch Failure" (खर्च करण्याची अक्षम्यता) म्हणतात.

सतत बचत करणाऱ्या मनाची मानसिकता. ४० वर्षे त्यांच्या मेंदूमधील स्विच "SAVE" वरच अडकलेला होता. प्रत्येक आर्थिक निर्णय हा साठवणुकीच्या दृष्टीने घेतला गेला. बचत ही फक्त सवय नव्हती; ती जगण्यासाठीची गरज होती. आणि निवृत्तीच्या दिवशी अचानक त्यांना सांगितले जाते—आता हा स्विच "SPEND" वर करा.

पण ते त्यांच्या हातात नसते. ४० वर्षांच्या काटकसरीने तयार झालेले न्यूरल पाथवे इतके मजबूत असतात की खर्च करणे म्हणजे त्यांना अपराधासारखे किंवा वेदनादायक वाटते.जणू त्यांनी आयुष्यभर वाढवलेले झाड ते स्वतःच तोडत आहेत.

भारतातील "Switch Failure" ची लक्षणे अनेक घरांमध्ये हे दिसून येते:

✓ FD व्याजाचा सापळा:

ते फक्त FD वरचे व्याजच खर्च करतात. मूळ रक्कम वापरणे म्हणजे पाप वाटते. महागाई वाढत असताना त्यांची जीवनशैली कमी होत जाते.

✓ वैद्यकीय उपचार टाळणे:

बँकेत कोट्यवधी रुपये असूनही, ते गुडघ्याचे ऑपरेशन किंवा मोतीबिंदू शस्त्रक्रिया पुढे ढकलतात—कारण सध्या खर्च जास्त वाटतो.

✓ प्रवासातील विरोधाभास:

७० व्या वर्षीही, ते Sleeper क्लासने प्रवास करतात, 2AC किंवा फ्लाइटऐवजी—कारण "ट्रेन तर पोचवतेच ना".

✓ वारशाचा दबाव:

संपूर्ण संपत्ती मुलांसाठी जपून ठेवण्याची मानसिकता. स्वतः काटकसरीत जगतात, जेणेकरून ४५ वर्षांच्या स्थिर मुलांना मोठी संपत्ती मिळेल.

✓ मोठी भीती: मी जास्त जगलो तर?

त्यांच्या मनात खोलवर भीती असते—पैसे संपले तर? महागाईने रुपयाची किंमत कमी होताना त्यांनी पाहिली आहे. त्यांना वाटते ₹३ कोटी आज पुरेसे असले तरी २० वर्षांनी हॉस्पिटलचा खर्च प्रचंड असेल.

म्हणून ते अत्यंत सुरक्षिततेचा अतिरेक करतात. ते सर्वात वाईट परिस्थितीसाठी तयारी करतात—आणि त्यामुळे सर्वोत्तम क्षण गमावतात.

अंतिम परिणाम: सर्वात श्रीमंत मृतदेह .

या "Switch Failure" चा शेवट म्हणजे न जगलेले आयुष्य. ३०, ४०, ५० व्या वर्षी त्यांनी भविष्याच्या

सुखासाठी त्याग केला. पण जेव्हा तो दिवस येतो, तेव्हा ते त्या सुखाचा आनंद घेऊ शकत नाहीत. ते कब्रस्तानातील सर्वात श्रीमंत लोक बनतात. मागे ठेवतात—मोठी बँक बॅलन्स, न वापरलेले घर, आणि सोन्याचे दागिने.

पण स्वतःसाठी न घेतलेले आनंद, न केलेले प्रवास आणि न दिलेली उदारता यांचा पश्चात्ताप घेऊन जातात.

स्विच कसा बदलायचा?

**Permission to Spend Fund:**
एक वेगळे खाते उघडा. त्यातील पैसे फक्त आनंदासाठी खर्च करायचे—वाचवायचे नाहीत.

**Bucket Strategy:**
पैसे दोन भागांत विभागा.
A: सुरक्षित (जगण्यासाठी)
B: जीवनाचा आनंद घेण्यासाठी

- ✓ वारशाचा विचार बदला:

मुलांसाठी सर्वात मोठी भेट म्हणजे त्यांना आनंदी, स्वतंत्र पालक दिसणे.

तळाचा निष्कर्ष

पैसा म्हणजे साठवलेली ऊर्जा आहे.तुम्ही आयुष्यभर ही ऊर्जा साठवली. जर ती तुम्ही आनंद, सुख आणि अनुभवात रूपांतरित केली नाही, तर ती वाया जाईल.तुम्ही ४० वर्षे काम केलेत फक्त हॉस्पिटलमध्ये श्रीमंत पेशंट होण्यासाठी नाही.

स्विच बदला. तिकीट बुक करा. एसी चालू ठेवा.
"तुम्ही ते कमावले आहे."

## आरोग्य साधना

दिनांक ४ एप्रिल रोजी "धन्वंतरी हॉल मध्ये एक प्रदर्शनी भरलेली होती . ही प्रदर्शनी जेष्ठ नागरिकांसाठी ज्या संस्था काम करतात त्या संस्थांची माहिति सर्वाना व्हावी यासाठी होती, ह्या संस्था जेष्ठ नागरिकांसाठी काय काय काम करतात, त्यांच्या कामाची पद्धत काय आहे त्याची माहिति

सर्वच संस्था या आपल्या सेवेसाठी पैसे आकारतात . त्या संस्थांची थोडक्यात माहिति खालीलप्रमाणे

१) मोरया दातांचा दवाखाना: तुमच्या घरी पॉटेबल डेंटल चेअर घेऊन येतात व संपूर्ण दंतउपचार करतात त्यांचा फोन नंबर आहे, ८६२३८२९९६२

२)रेनबो डे केअर सेंटर : सकाळी ९ ते संध्याकाळी ५ या वेळेत जेष्ठ नागरिक या सेंटर मध्ये येतात त्यांना ब्रेक फास्ट , जेवण व चहा मिळतो घरातून सेंटरपर्यंत आणण्याची व परत पोचविण्याची सोय आहे . ते सेंटर डाव्या भुसारी कॉलनीत आहे त्यांचा फोन नंबर आहे ९८५०८८६५७५

३)वृद्ध मित्र: जेष्ठ नागरिकांना सकस अन्न, औषधे, व्हिटॅमिन्स, सप्लिमेंट्स, अडल्ट डायपर्स, चालण्याच्या काठ्या (Walking Sticks ), व्हील चेयर्स पुरविणे , डॉक्टरचा सल्ला, विविध तपासण्या , फिझिओथेरपी, घरात रुग्ण असतील तर रुग्ण स्वच्छता, बेडरिडन रुग्णांना फीडिंग, बेड सौर्स, कॅथेटर, डायपर पुरवणे, बदलणे, या व्यतिरिक्त आपण ज्या सेवा देतो त्या सर्व सेवा देतात. त्यांच्या माहितीपत्रकानुसार या सर्व सेवा बाजारभावाच्या तुलनेत ५० ते ७५% सवलतीच्या भावाने पुरविल्या जातात. त्यांचा फोन नंबर आहे, ७७५७९८८६४४, ९५७९९८५८४४

४) अन्वय किन केअर: हि संस्था हेल्थकेअर, इमर्जन्सी केअर, सोशल केअर, डिमेन्शिया केअर इत्यादी सेवा देते त्यांचे फोन नंबर, ७२८८८१८१८१ व ९३९२६८२९२२

५)Being WithYou : हि संस्था रुग्णलयात दाखल झालेल्या रुग्नांना केअर टेकर म्हणून काम करते. स्वयं सेवकांची सेवा Time Bank मध्ये जमा होते आणि रुग्णाकडुन परस्पर स्वयंसेवकांना २०० रुपये मिळतात. फोन नंबर, ७२७६७९७१२४ (पुणे )

या व्यतिरिक्त अजून काही संस्था

१) दिवेकर केअर सर्विसेस: फोन नंबर ८७००६९०१८६
२) समर्थ : ८७००६९०१८६
३) मदतनीस : ८०१०५४००७०
४) असिस्ट फॉर पेरेंट्स: WWW.assist4parents.com

नेहमी विविध सेवांसाठी विचारणा होते. त्या संस्थांची माहिती इतरांना देणेसाठी ही पोस्ट आहे,

++++++++++++

*स्मृतीतील कोरीव असे काही....*



## वाघाचे कातडयाचा अवैध व्यापार

मनोहर आ. सैंदाणे.
विभागीय वन अधिकारी (से.नि.)

दक्षिण चंद्रपुरात लेखक विभागीय वन अधिकारी (दक्षता) म्हणून कार्यरत असतांना वाघाचे कातडयाचा अवैध व्यापार बाबत काही गुन्हे दाखल केली होती, थोडक्यात देत आहे.

एकदा गुप्त माहितीची तक्रार (माहे मे २००२ महिन्याच्या शेवटी) मा. श्री पत्की भा.व.से. तत्कालिन वनसंरक्षक साहेब कडून भेटली. सदर तक्रार करणारा व्यक्तीचा बरोबर शोध घेऊन व तत्कालीन वनक्षेत्रपाल (फिरते पथक) श्री धानोरकर सोबत तपास केल्यानंतर मोठ्या प्रयत्ना नंतर गोंडपिंपरी गावा जवळील इसमाकडे (आरोपी क्रमांक १) अवैध वाघाचे कातडे व नखे असल्याचे कळाले . ते त्याने कोठे लपविले ते कळेना. त्याला अमिष दाखवून देखील सांगत नव्हता. मोठ्या महत्प्रयासाने त्याने सांगीतले की, तो रोज बैल चारण्यासाठी जंगलात जात होता. त्याने पाहिले की, काही इसम वाघाचे ओले कातडे सुकविण्यासाठी जंगलातील गोटयावर (खडकावर) सुकविण्यासाठी येवून बसत. हा प्रकार दोन ते तीन दिवस पाहिल्यावर त्याने (आरोपी क्रमांक १) या इसमांनी नजर चुकवून गुप्तपणे ते वाघाचे ओले कातडे

गुंडाळून घरी आणले. व त्याचे समधी /व्याही (आरोपी क्रमांक २) यांचेकडे दिले. त्याचे समाधीला आम्ही ताब्यात घेतले. त्याने ते कोठे लपविले ते कळेना. त्याला अमिष दाखवून देखील सांगत नव्हता. मोठ्या महत्प्रयासाने त्याने सांगीतले की, ते नदिपलीकडे आंध्र प्रदेशातील (नक्षलवादग्रस्त क्षेत्रातील )इसमास दिले. यावर खूप विचार करून आम्ही स्थानिक पोलीस समवेत गुप्त सभा घेतली. आमच्या सर्व कर्मचाऱ्यांचे वेष बदलले. व रंगीत फेटे , धोतर, कपाळावर टिळे लावून सदर नक्षलवादग्रस्त गावात जावून लग्नासाठी मुलीचे स्थळे पहाणेसाठी आलो आहोत असे सांगितल्यावर ,आरोपी क्रमांक 3 कडे पाणी प्यालो.

विषयावर विषय काढून चर्चेत म्हटल की, वाघाची कातडी भेटली तर आम्ही विकत घेऊ व देणाऱ्यास चांगली किंमत देऊ , असे सांगितल्यावर (आरोपी क्रमांक १) ने पूर्वी गुप्त सभेत ठरविल्याप्रमाणे (आरोपी क्रमांक ३) यास सांगितले की, जे वाघाचे कातडे आहे ते आणून दे. हे सर्व त्याचे ग्राहक/खरेदीदार आहेत. असे ऐकल्यावर त्याने वाघाचे चामडे आणून ठेवले. आम्ही त्यास म्हटले की, चला , पैसे नदीकाठी देतो व चामडे घेऊन चालते झालो. तेव्हा तो (आरोपी क्रमांक 3) हा कपडे घालून येतो म्हणून पळाला. पूर्ण गाव शोधला पण सापडलाच नाही. वरील कार्यवाही फारच जीव धोक्यात घालून केली आहे. पुढील तपास सुरु ठेवला. आरोपी क्रमांक 3 ला नोटीस/पत्रे देऊन नामोहरम केले व त्यास मा. चंद्रपूर न्यायालयात हजर रहाणेस बाध्य केले. यातील सूत्रधाराचा तपास सुरुच होता. चामडे सुचविण्यात कामी गौड -पिंपरी येथील चौकीदार, (आरोपी क्रमांक ४) हा फरार होता. त्याचे घरी त्याचा पाठपुरावा करून त्याचे नातेवाईकांचे पत्ते शोधली व शोध मोहीम सुरू ठेवली. पेरीमीली (अहेरी) येथे त्याचे नातेवाईक पोलीस खात्यात होते. मा. श्री तत्कालीन पोलीस अधीक्षक साहेब, गडचिरोली यांना समक्ष भेट घेऊन परिस्थिती विषद केल्यावरून, त्यांनीच संबधित पोलीस कर्मचाऱ्यांकडून आरोपी क्रमांक ४ चा पत्ता आम्हास देण्यास भाग पाडले. व त्यास मा. चंद्रपूर मधील न्यायालयात आम्ही हजर केले. पुढील आरोपी क्रमांक ५ याचा तपास केला असता तो आंध्रप्रदेश ला कामासाठी गेला म्हणून त्याची घरची मंडळी सांगत होती. परंतु सत्य परिस्थितीनुसार तो गावातच गुप्त पणे रहात होता. त्यावर आमचे वन कर्मचारी यांनी पाळत ठेवली. त्यावर सापळा रचून त्याची माहीती काढली. तो दिवसभर गायब रहायचा व रात्री त्याचे घरी न येता त्याचे प्रेयसीवर घरी टीव्हीवर कार्यक्रम पहायचा. व तेथेच झोपायचा. ही गुप्त बातमीदार हे स्थानिक कर्मचाऱ्यांकडून मिळाली. लवकर सकाळी त्यास (आरोपी क्रमांक ५) यास उचलावयाचे ठरले. त्याप्रमाणेच आम्ही कर्मचारीची चमूसह लक्ष ठेवून ठरल्याप्रमाणे आरोपी क्रमांक 5 यास उचलले. या कामी लेखक व वन कर्मचारी यांनी रात्रभर जागून रस्त्यावर अंधारातून लक्ष ठेवून काम केले आहे. सहभागी सर्व कर्मचाऱ्यांचे गोपनीय अहवाल उत्कृष्ट लिहिणे साठी तत्कालीन उप वन संरक्षक श्री रेड्डी भा.व.से., मध्य चांदा यांना लेखी विनंती केली होती. तद्नंतर नियमानुसार आरोपी क्रमांक ५ अटक करून मा. ज्युडिशियल मॅजिस्ट्रेट-न्यायाधीश साहेब चंद्रपूर यांच्या समोर हजर केले. आता मुख्य आरोपी शोधणे आवश्यक होते. हा आरोपी क्रमांक ४ चा साला होता. त्याला कुटूंब मुलाबाळे वगैरे काही नव्हते. त्याला शोधत शोधत पहाटे इंद्रावतीनदी वरच अंघोळी केल्या. व तपासात कळाले की तो आंध्रप्रदेश मध्ये लग्नात दिसला. आमचा शोध घेणारा चमू पोहचेल तोपर्यंत तो जंगलात पळाला. नंतर आरोपी क्रमांक ४ चे घरी तो एके दिवशी सापडला.त्यात उलगडा असा झाला की, आरोपी क्रमांक ४ व मुख्य आरोपी यांनीच शिकारीच्या आदल्या दिवशी हरणाची शिकारीसाठी जाळ्याचा सापळा रचला होता. त्यात अचानक वाघ फसला व तो जाळ्यात मरत नव्हता., म्हणून मुख्य आरोपीने कुऱ्हाडीचे मागील बाजूने ( मुंदीने ) त्यास प्रहार केला व वाघ मेला. सदर प्रकरण (माहे जुलै २००७)न्यायप्रविष्ट करण्यात आले.या वेळी मा. श्री. रेड्डी भा.व.से. तत्कालीन उप वन संरक्षक, मध्य चांदा (सध्याचे प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा वनबल प्रमुख) याचे मार्गदर्शन लाभले होते.

सदर प्रकरणाचे तपासात आम्हाला खूप त्रास झाला. श्री धानोरकर (मयत)तत्कालीन वनक्षेत्रपाल फिरते पथक व त्यांच्या चमूने रात्र, दिवस एक केला. ते सर्व अभिनंदनास पात्र आहेत. सदर प्रकरणात सुमारे १२-१३ वर्षांनी लेखकास ज्युडिशियल मॅजिस्ट्रेट, न्यायाधीश साहेब, गोड पिंपरी येथे या सदर प्रकरणात फेरतपासणी साठी बोलावले.

काही कालानंतर एका दुसऱ्या वाघाचे कातडे ची तस्करी बाबत तत्कालीन मा. वनसंरक्षक सर्वश्री पत्की भा.व.से. साहेबाकडे माहे जुलै २००४ ला गुप्त बातमी आली. त्यांचे मार्गदर्शनानुसार पुढील तपास सुरू केला. तस्कर चामडे आलापलली तालुका. अहेरी (गडचिरोली) येधून वहातूक करणार होते. या करिता दोन वेग- वेगळे चमू तयार करण्यात आले. एका चमूत बातमीदार, वनक्षेत्रपाल कोठारी , (अहेरी) श्री कांबळे व ठरले की, वन कर्मचारी सिव्हील ड्रेस मध्ये पेट्रोल पंप,आलापलली येधे जवळ दबा धरुन बसतील. (यास चमू क्रमांक १ संबोधण्यात यावे). दूसरा चमूत लेखक स्वत: व वनक्षेत्रपाल फिरते पथक व कर्मचाऱ्यां सह जवळच "वनभुवन" कार्यालया मध्ये पहिल्याच मजल्यावर , खिडकीतून पहात दबा धरुन बसतील. (यास चमू क्रमांक २ संबोधण्यात यावे). व चमू क्रमांक 1ला सपोर्टींग पार्टी म्हणून आम्हास काम दिले होते.

श्री कांबळे व त्यांचा चमू क्रमांक १, हा कोडवर्ड भाषेत मोबाईल वर संदेशवहन व माहिती देण्याचे काम करतील असे ठरले होते. काम फत्ते झाल्यानंतर जीपचालक ब्रेकचे लाल दिवे ब्रेक दाबून ईशारा करतील. आरोपींवर एकदम सर्वानीच मिळून कार्यवाही करायची होती. ठरल्याप्रमाणे वेळेनुसार प्रत्येक कर्मचाऱ्यांकडून सरावाची तयारी केली. व दिलेल्या ठिकाणी बसलो. परंतु मोबाईल चे कव्हरेज नसल्याने संपर्कच होत नव्हता. जर पार्टीमधील कर्मचारी मौकयावर पाठवला असता गुप्तता भंग पावली असती. आमची योजना उघडकीस येण्याची शक्यता होती. आमची शिकार हातून सुटते असे वाटत होते. त्यात चमू क्रमांक 1 च्या जीपने भोवती पेट्रोल पंप जवळ पुष्कळ गाड्या येउन उभ्या झाल्या होत्या. आम्हाला काहीच इशारा समजणार नव्हता. जर रेड फेल झाली तर श्री पत्की साहेबांना फेस करावयाचे होते. फारच टेन्शन आले होते. काही न करता आम्ही शिक्षेस पात्र ठरवले जाणार होतो, याची भिती होती. नंतर कळाले की, तस्कराने वाघाचे चामडे तेथे आणले नव्हते, त्याने

ठिकाण बदलले होते. त्यानुसार चमू क्रमांक १ ह्याचे वाहन निघाल्याचे आम्ही खिडकीतून पाहिले. व तात्काल चमू क्रमांक १ चे गाडीचे मागे पाठलाग सुरू केला. आलापलली ते आष्टी रोड वर गाडी थांबवून चमू क्रमांक १ चे मागे थांबलो. नंतर तस्करान चामडे रस्त्यावर शेजारी जंगलातून लपविलेले वाघाचे चामडे रोडवर बॅग आणून दिली. तेव्हा जप्तीची कागदपत्र, अटक पंचनामा इतर कागदपत्र तयार केले.

या प्रकरणी श्री नितिन देसाई वन्यजीव संरक्षण स्वयंसेवी संस्था भारत, यांचे विशेष सहकार्य लाभले. आरोपी क्रमांक १, व आरोपी क्रमांक 2 यांना वनक्षेत्रपाल फिरते पथक व कर्मचाऱ्यां तर्फे मा. श्री (ज्युडिशियल मॅजिस्ट्रेट) न्यायाधीश साहेब यांचे समोर हजर करण्यात आले. सदर आरोपी हे ईतर लोकांना सांगत असत की हा माझा डाव्या हाताचा खेळ आहे. हे आरोपी छत्तीसगड राज्यातून नदी मार्गाने होडीने रात्री बॅटरी ने उजेड दाखवून गुप्तपणे पलीकडून वाघाचे कातडे इंद्रावती नॅशनल पार्क मधून आणायचे.

वरील तपासाची मा. श्री तत्कालीन वनसंरक्षक (श्री पत्की भा.व.से.) साहेब यांचे मार्गदर्शन घेत होतो. पुढील तपासासाठी आरोपींना व इतर वन कर्मचाऱ्यांना चंद्रपूर - असरअली - पातागुडम पर्यंत शासकीय जीपने, पुढे इंद्रावती नदीमधून नावेने घेउन भोपाल- पटटनम, बिजापूर येथे खाजगी जीपने (वनक्षेत्रपाल ,भोपाल- पटटनम, यांचे सहकार्याने) मार्गस्थ झालो होतो. तिथे जावून उप संचालक राष्ट्रीय उद्यान इंद्रावती, श्री द्विवेदी भा.व.से. यांचेही निदर्शनास आणले . तद्रंतर स्थानिक उप वन विभागीय अधिकारी, श्री राय यांची भेट घेतली. व परिस्थिती सांगितली . व चर्चा केली. तेथील वनकुटीवर मुक्काम करून अतिशय दुर्गम व नक्षलवादग्रस्त भागातील क्षेत्रातून त्याच मार्गानेच परत आलो.

वरील दोन्ही प्रकरणात तपास पध्दत फारच किचकट, गुंतागुंतीची व खूपच लांब पल्ला होता. सहकार्य करण्यास एक पाऊल सहकारी मागेच असतात. या भागात आरोपीची व्यवस्था लावणे अजून खूप जिकिरीचे होते. हे प्रकरण माहे डिसेंबर 2004 ला न्याय प्रविष्ट करण्यात आले. या धाडीत सहभागी सर्व कर्मचाऱ्यांनी जीव धोक्यात घालून उपाशीपोटी, तहानलेले होऊन कामे केली आहेत व अवैध शिकारी वर धाक/वचक बसविला होता. याची दखल घेऊन श्री नितिन देसाई "वाईल्ड लाईफ प्रोटेक्शन सोसायटी ऑफ ईडिया" स्वयंसेवी संस्थाचे तर्फे यांनी प्रमाण पत्र व मनगटी घड्याळे पुरस्कार म्हणून लेखकास व कर्मचाऱ्यांना दिले होते. महाराष्ट्रात अश्या प्रकार चे प्रकरणातील तपास कामी साध्य होणे करीता जिल्ह्यातील पोलीस अधीक्षक साहेब, यांना टायगर सेल चे अध्यक्ष म्हणून नियुक्त करण्यात आले आहेत. त्या प्रमाणे त्याची मदत घेण्यात येत होती.



---

# माझी फोटोग्राफी -६

✍प्रमोद यादव

आज तारीख २६.०९. २०२५.

डेंगबोचे (Dengboche) येथे पोचलो होतो. रात्री झोप चांगली झाली नव्हती . तेथील हवामानामुळे शरीरात कब होऊ लागला होता.आजचा दिवस शरीर आणि हवामान सुसंगत होण्यासाठी म्हणून विश्रांतीचा दिवस होता . बहुतेक सर्व ट्रेकर या ठिकाणी विश्रांती घेतात . तेथील हवामानाशी आपले शरीर काही प्रमाणात जुळवून घेते . पाच हजार मीटर ऊंचीवर गेल्यावर हवेतील ऑक्सीजन विरळ होतो. त्या मुळे अनेक प्रश्न उपस्थित होतात. एकतर झोप नीट लागत नाही . म्हणजे झोप येतच नाही. शिवाय जेवण देखील जात नाही.अगदी आवडीची पंच पक्कवान देखील समोर असली तरी ती खाण्याची इच्छा त्या ठिकाणी होताच नाही. अगदी बदाम काजू बेदाणे देखील . वातावरणातील ऑक्सिजन अत्यंत कमी झालेला असल्याने शरीरसाठी आवश्यक आहे ,त्याची भरपाई पाणी पिऊनच करावी लागते .

दिवस जरी विश्रांतीचा असला तरी आमचे ट्रेकर मार्गदर्शक मिहीर याने आजच्या दिवसाचा छोटा ट्रेक करण्यासाठी जायचे आहे असे अगोदरच सांगितले होते. तेथील जी कमी ऊंचीची पर्वतरांग पाठीमागील बाजूस आहे . 300 मीटर उंचीवर ट्रेकिंग साठी जायचे आहे. कारण पुन्हा तेच हवामान आणि शरीर यांचे सुसंगत होण्यासाठी . हे तीनशे मीटर चढण चढून पुन्हा चार तासाने परत यायचे . त्याप्रमाणे आम्ही आज आठ वाजता ट्रेकिंगला सुरुवात केली लवकरच ज्या ठिकाणी जायचे होते तिथपर्यंत पोहोचलो.

या ठिकाणी जाणवले अनेक परदेशी ट्रेकर देखील याच पद्धतीने जुळून घेण्यासाठी आले होते. वातावरणाची मिळते जुळते होण्यासाठी त्यांना देखील हाच नियम होता. कॅमेरा बरोबर असल्यामुळे तेथील पर्वतरंगाचे फोटो काढले होते. आज काही परदेशी ट्रेकर की जे विविध देशातून आलेले होते. त्यांचे काही ट्रेक मधील आठवणी म्हणून फोटो घेता येतात का म्हणून सहज एक परदेशी ट्रेकला विचारले त्याने हसून प्रतिसाद दिला . मग काही ट्रेकरचे फोटो काढले . त्यांची देखील परवानगी घेऊन त्यांचे फोटो काढले . सोबत टाकत आहे. हे ट्रेकर पुन्हा आयुषात कधीच परत भेटणार नाहीत हे माहीत होते. पण तो फोटो काढण्या साठी तो क्षण होतो. कोणाचाही फोटो काढायचा असेल तर त्याची परवानगी घेणे योग्य नाहीतर ते परवानगी न घेत काढणे हे बरोबर नाही . हा अनुभव लडाख नुब्रा valley मध्ये आला होता . आज फोटो काढण्यासाठी तेथे फारसा का स्कोप नव्हता .

आणि त्यामुळे एक वेगळा विषय मनात आला आणि त्याप्रमाणे त्यांचे देखील आठवणी म्हणून फोटो काढले.त्यांनी

देखील त्याला खूप सुंदर छान प्रतिसाद दिला . फोटोग्राफितील तो अनुभव देखील वेगळाच असतो.

क्रमशः












## वाचक प्रतिक्रिया -सेवक वार्ता, एप्रिल-२०२६

*नेहमी प्रमाणेच परिपूर्ण अंक.नविन कार्यकारिणी चे हार्दिक अभिनंदन. पुर्वी नियमीतपणे वार्षिक सर्वसाधारण सभा पुण्यात होत असे. त्यामुळे अनेक जेष्ठ सभासदाना उपस्थित राहणे शक्य होत असे. याबाबत जरुर विचार व्हावा. वृत्त स्तरावर समन्वयक नेमल्याने श्री गवळी यांना मदत होईल अशी अपेक्षा आहे. माझे मत, व पर्यावरण वानिकी संबधित व्यक्तिगत माहिती, सुंदर फोटोग्राफ्स कलरफुल अंक. गवळी साहेबांसाठी शब्द सुमन अपुर्ण आहेत. -पी. एन. कुकडोलकर

## वेधक वृत्त

खालील आजीव सदस्यांची नावे समाविष्ट करून वेबसाइट अद्यायवत केली आहे

अ.क्र. १९७ एन एस कावळे, वनपाल
अ.क्र. १९८ समीर देशपांडे, सवसं
अ.क्र. १९९ आर एस डोनाडे, वपअ
अ.क्र. २०० सुदेश झाडे, वनपाल
अ.क्र. २०१ मनोहर सैंदाणे, विवअ
अ.क्र. २०२ जी. जी. उपासे, रेंजर सर्वेअर

केवळ खाजगी वितरणासाठी
प्रकाशक - सेवक संघ, महाराष्ट्र, पुणे
संपादन - एस. के. गवळी
कार्यालय - वन ग्रंथालय, दुसरा मजला, वनभवन, भांबुर्डा वन विहार, गोखले नगर, पुणे - १६